

शिवसेना

## सुरक्षित, निरोगी, स्वच्छ आणि सुंदर मुंबईसाठी

# वचननामा

मुंबई महानगरपालिका निवडणूक २०१७

# करमुक्ती व कर सवलत

- ## ५०० चौ. फुटापर्यंतच्या सर्व सदनिकांना मालमत्ता कर माफ. ५०० चौ. फुटांवरील व ७०० चौ. फुटांपर्यंत आकाराची घरे असलेल्या करदात्यांना मालमत्ता करात सवलत देणार.

झोपडपट्टयांमधून पक्या घरांमध्ये राहण्यास गेलेल्यांचे तसेच मुंबईत स्वत:चे घर असावे असे स्वप्न बाळगणाऱ्यांचे मुंबईत घर घेण्याचे स्वप्न तर पूर्ण होते. मात्र मुंबई महानगरपालिकेकडून आकारण्यात येणारा मालमत्ता कर या जनतेला परवडत नाही. त्यामुळे बरेच वेळा नाईलाजाने मुंबईतील आपले घर विकून मुंबईकरांना अन्यत्र स्थलांतर करावे लागते. मुंबईकरांची ही अडचण लक्षात घेऊन मुंबईतील ५०० फुटापर्यंतच्या सर्व सदनिकांकडून आकारण्यात येणारा मालमत्ता कर माफ करण्यात येईल. तसेच ५०० चौ. फुटांवरील व ७०० चौ. फुटांपर्यंत आकाराची घरे असलेल्या करदात्यांना मालमत्ता करात सवलत देण्यात येईल.

- ## ७०० चौ. फुटांवरील सदनिका धारकांसाठीही विशेष योजना

मुंबईत कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचप्रमाणे मुंबईकर पिण्याच्या पाण्याचा वापर अन्य कामांसाठी (उदा. गाडी धुण्यासाठी, शौचालय, झाडांना पाणी घालणे) करतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होतो. यातून मार्ग काढण्यासाठी मुंबईतील ७०० फुटांवरील ज्या सोसायटयांमध्ये कचरा विलगीकरण, गांडुळ खत प्रकल्प, रेन वॉटर हार्वेस्टींग, सोलर एनर्जी तसेच वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या सोसायट्यांना मालमत्ता करात सवलत देणार. या प्रक्रियेसाठी आवश्यक सुविधा उभारण्याची सोसायट्यांना विशेष परवानगी देणार.

# शिक्षण

- **देशाचे उज्वल भवितव्य असणाऱ्या तरूणांसाठी 'ई' वाचनालय उभारणार.**

  छोटया आकाराच्या घरातील शाळेत तसेच कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी घरामध्ये पुरेशी जागा उपलब्ध होत नाही. विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन शहर, पश्चिम तसेच पूर्व उपनगरांमध्ये अत्याधुनिक साधनांनी युक्त अशी ई वाचनालये विभागवार उभारणार.

- **कौशल्य विकासास व व्यवसायभिमुख शिक्षणास चालना**

  बदलत्या काळानुसार शिक्षण क्षेत्रात झपाट्याने अमुलाग्र बदल होत आहे. परंपरागत शिक्षण व्यवस्थेबरोबरच शिक्षणानंतर तरुणांच्या हाती रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत बदल करणे आवश्यक आहे. मुंबईतील युवकांना विविध कौशल्यांचे तसेच व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरी व्यवसायासाठी सक्षम बनविणारी कौशल्य विकास केंद्रे मुंबई महानगरपालिकेतर्फे सुरु केली जातील.

- **महापालिकेच्या शाळांमध्ये 'आत्मरक्षण प्रशिक्षण केंद्र'**

  गेल्या काही वर्षांमध्ये मुलींवरील वाढते हल्ले पहाता मुलींना भयमुक्त जीवन जगता यावे व आत्मसंरक्षण करता यावे यासाठीमहापालिकेच्या शाळांमधून 'आत्मरक्षण प्रशिक्षण केंद्रे' सुरु करणार.

- **महापालिकेच्या शाळेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना भविष्यात महापालिका सेवेत नोकरीकरिता प्राधान्य.**

- **महापालिकेची 'संगीत अकादमी'**

  महापालिकेची प्रायोगिक तत्वावर सुरु केलेली संगीत अकादमी सर्व विभागांत सुरू करणार.

- महापालिका शाळांमधील 'मध्यान्न भोजन योजने' अंतर्गत अधिक दर्जेदार व पौष्टिक भोजनाची व्यवस्था करणार.

# सुंदर मुंबई

- **देशाच्या स्वातंत्र्याची गाथा सांगणारे स्मृती दालन**

  देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी खरोखर त्याग केला, मोलाचे योगदान दिले तसेच ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यांच्या स्मृती चिरंतर रहाव्यात आणि ही प्रेरणा भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी मुंबईत स्वातंत्र्यसमर स्मृतीदालन उभारणार.

- **पर्यटन क्षेत्र**

  मुंबईच्या पूर्व किनाऱ्यावरील मोकळया जमिनीचा हिस्सा मुंबई महापालिकेसाठी संपादित करुन तेथे पर्यटन क्षेत्र उभारण्याची योजना राबविणार.

# उद्याने

- **मुंबईतील सर्व उद्यानांची पुनर्रचना करून नवीन उद्याने निर्मिण्यासह वाहतूक बेटांचे सौंदर्य वाढविणार.**

- **ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्रे**

  ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळयासाठी उद्यानात विरंगुळा केंद्रे बांधणार तसेच तेथे दूरदर्शन संच, कॅरम, बुद्धिबळ इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देणार.

- **मैदानी खेळांसाठी अधिकाधिक मैदानांची उभारणी करणार.**

- नोकरदार पालकांसाठी त्यांच्या लहानग्यांना सांभाळणारी पाळणाघरे विभागा-विभागांतून सुरू करणार.

# आरोग्य

- **मुंबईकरांसाठी बाळासाहेब ठाकरे आरोग्य कवच योजना**

  शासकीय आरोग्य योजनांच्या लाभापासून वंचित राहणाऱ्या सर्व मुंबईकरांना बाळासाहेब ठाकरे आरोग्य कवच योजनेतून सर्व तऱ्हेच्या आरोग्य सुविधा व उपचार विनामूल्य उपलब्ध करुन देणार.

- **पूर्व उपनगरात गोवंडी येथील शताब्दी रूग्णालयात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार.**

  उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा देता याव्यात यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील विलेपार्ले येथे कूपर रूग्णालय येथील बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महविद्यालय सुरू करण्यात आले. त्याचप्रमाणे पूर्व उपनगरांतील गोवंडी येथील शताब्दी रूग्णालयात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार.

- ## कूपर रुग्णालयात कॅथलॅब केंद्र उभारणार.

धकाधकीचे जीवन, कामाचा ताण तसेच वाढत्या प्रदुषणामुळे मुंबईकरांमध्ये हृदयाचे विकार बळावले आहेत. खाजगी रुग्णालयात यावर उपचार करणे महागडे असल्याने सामान्य मुंबईकरांसाठी हृदयविकारांच्या आजारावर उपचार करणे शक्य व्हावे यासाठी शहरातील नायर रुग्णालयाप्रमाणे पश्चिम उपनगरातील कूपर रुग्णालयात व पूर्व उपनगरात कॅथलॅब केंद्रे उभारणार.

- ## मधुमेहावर उपचार करणारी विशेष रुग्णालये उभारणार.

देशात, राज्यात तसेच मुंबईत मधुमेहाच्या रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. मधुमेहाने ग्रस्त व्यक्तिला आयुष्यभर उपचारासाठी बराच खर्च करावा लागतो. मुंबईकरांची गरज लक्षात घेऊन मधुमेहावर उपचार करणारी विशेष रुग्णालये उभारण्यात येणार तसेच मोठ्या रुग्णालयांमध्ये मधुमेहींसाठी विशेष विभाग सुरु करणार.

- ## आरोग्य सेवा आपल्या दारी

मुंबईच्या अनेक भागांमध्ये ज्येष्ठ नागरिक एकट्याने राहतात. तर काहींना विविध व्याधीमुळे रुग्णालयात जाणे शक्य होत नाही. अशा रुग्णांना तसेच ज्येष्ठांना वेळीच प्राथमिक उपचार मिळावे यासाठी मुंबई महानगरपालिकेतर्फे 'आरोग्य आपल्या दारी' या संकल्पनेच्या माध्यमातून मुंबईच्या विविध भागांमध्ये आरोग्य वाहिनी (ओपीडी ऑन व्हिल) तयार करणार.

- ## आपत्तीजन्य परिस्थितीत अथवा भीषण दुर्घटना समयी एकाच वेळी जास्तीत जास्त रुग्णांना आरोग्यसेवा प्राप्त व्हावी याकरिता 'बहुरुग्णवाहिका' सुरु करण्यात येणार.

- ## मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये जेनेरिक मेडिसिनसाठी दुकाने

विविध आजारांवरील औषधांच्या किंमतीत वाढ झाल्याने ही औषधे विकत घेणे सर्वसामान्य जनतेच्या आवाक्याबाहेर गेले आहे. महापालिका रुग्णालयातील दाखल रुग्णांना जेनेरिक औषधे दिली जातात. मात्र त्यांना बरे होऊन घरी गेल्यावर महागडी ब्रॅण्डेड औषधे परवडत नसतानाही घ्यावी लागतात. सामान्य जनतेला विविध आजारांवर माफक दरात औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये 'जेनेरिक मेडिसिन' दुकानांना परवाने देणार.

- ## सार्वजनिक स्वच्छतागृहात महिलांकरिता 'सॅनिटरी नॅपकीन व्हेंडिंग मशीन'ची सोय करणार.

# कचरा व्यवस्थापन

- **देवनार डम्पिंग ग्राऊंड येथे कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणार.**

  मुंबईतील बहुतांशी घनकचरा हा देवनार येथील डम्पिंग ग्राऊंडवर टाकण्यात येतो. त्यामुळे येथील कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून हा प्रश्न मार्गी लावणार.

- **मलनि:सारण वाहिन्यांची व्याप्ती वाढवणार.**

- **मुंबई शहरात सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या वाढवणार.**

- **नागरिकांच्या सोयीसाठी रात्रीसुद्धा कचरा उचलण्याची सोय सर्वत्र सुरु करणार.**

# पाणी

- **सांडपाणी पुनर्वापर करण्यासाठी मलजल प्रक्रिया केंद्र**

  मुंबईकरांना दरदिवशी पुरविण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा वापर हा शौचालयाबरोबरच अन्य कामांसाठी मोठया प्रमाणात होतो. भविष्यात पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन मुंबईकरांना पिण्याचा प्रश्न भेडसावू नये यासाठी सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे मल:निसारण प्रकल्प (सिव्हरेज ट्रीटमेंट प्लॅन्ट) उभारणार. हे पाणी अन्य कामांसाठी वापरणार. मालाड, वर्सोवा, घाटकोपर व भांडूप येथील प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया केंद्रे त्वरेने पूर्ण करणार.

- **जुन्या विहिरी पुनर्जिवीत करून त्यातील पाणी दैनंदिन वापरासाठी उपयोगात आणणार.**

  मुंबईत झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे पिण्याच्या पाण्याच्या मागणीत वाढ होत आहे. मुंबई शहर, पश्चिम तसेच पूर्व उपनगरांमधील अनेक भागांमध्ये जुन्या विहिरी आहेत. यातील अनेक विहिरींची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. मुंबईतील अशा विहीरींची योग्य ती निगा राखून विहिरींतील पाण्याचा वापर दैनंदिन दुय्यम कामासाठी करणार.

- **मुंबईकरांना २४ तास पाणी पुरवठा करण्यासाठी गारगाई, पिंजाळ हे प्रकल्प प्राधान्याने मार्गी लावणार.**

  मुंबईतील वाढत्या लोकसंख्येबरोबरच पिण्याच्या पाण्याच्या मागणीत वाढ होत आहे. भविष्यात यात अधिक वाढ होणार आहे. काळाची ही पावले ओळखूनच जनतेची वाढती तहान भागविण्यासाठी मुंबई महापालिकेने या अगोदर मध्य वैतरणा प्रकल्प उभारुन काही

प्रमाणात हा प्रश्न सोडविला. सध्याच्या परिस्थितीत मुंबईकरांना पुरेसा पाणी पुरवठा करण्यात येत असला तरी तो अपुरा पडेल अशी चिन्ह आहेत. त्यामुळे पाण्याची ही वाढती मागणी लक्षात घेऊन मुंबईचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी गारगाई, पिंजाळ या प्रकल्पांकरिता केंद्र सरकारच्या आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्यांसाठी पाठपुरावा करून मुंबईकरांना २४ X ७ पाणी पुरवठा करण्यासाठी हे प्रकल्प मार्गी लावणार.

# पर्यावरण

- **मुंबईकरांच्या आरोग्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवडीसह वृक्ष संवर्धन**

मुंबईतील सर्व भागांमध्ये पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, मुंबईच्या सौंदर्यात अधिक भर घालण्यासाठी तसेच अधिक शुध्द हवा मिळावी यासाठी विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करणार.

अ) मुंबईमध्ये प्रदूषित हवा शुध्द करण्यासाठी हवाशुध्दीकरण यंत्रे बसविणार. वृक्ष सौंदर्याचे जतन करण्यासाठी विशेष पथके नेमून झाडांवर पडणाऱ्या किडीचे नियंत्रण करण्याची तसेच वृक्षांना आकारबध्द ठेवण्यासाठी उद्यान विभागात स्वतंत्र उपविभाग सुरू करणार.

- **नविन विकास आराखड्यात आरे कॉलनीतील हरित पट्ट्याचे आरक्षण कायम ठेवणार.**

# रस्ते

- **मुंबईकरांकरिता सागरी मुक्त मार्ग ( कोस्टल रोड ) करणार.**

नरिमन पॉईंट ते दहिसर नियोजित 'कोस्टल रोड' विविध परवानग्या मिळवून पूर्ण करणार. ज्यायोगे नरिमन पॉईंट ते दहिसर हे अंतर केवळ २० मिनिटात पार होणार.

- **पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे जोडणाऱ्या गोरेगाव - मुलुंड जोडरस्ता मार्गाच्या कामास चालना देऊन असे अधिक रस्ते बांधण्याच्या योजना राबविणार.**

- **आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उर्वरीत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण व डांबरीकरण करून खड्ड्यांचा प्रश्न निकाली काढणार.**

# पूर नियंत्रण

- **उपनगरात मोगरा तसेच माहुल येथे पम्पिंग स्टेशन**

मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे मुंबईत काही ठिकाणी पाणी तुंबायचे. मुंबई महानगरपालिकेने रस्त्यावर साचणाऱ्या निचरा करण्यासाठी ब्रिटानिया, इर्ला, लवग्रोव तसेच क्लिवलॅन्ड येथे पम्पिंग स्टेशन उभारून मुंबईकरांना दिलासा दिला. त्याचप्रमाणे आता उपनगरात मोगरा तसेच माहुल येथे पम्पिंग स्टेशन उभारणार.

# 'बेस्ट' बस सेवा

- **मुंबई महानगरपालिका तसेच बेस्ट उपक्रमाचा अर्थसंकल्प एकत्र करून मांडणार.**

परिवहन क्षेत्रातील बेस्ट सेवा ही सर्वसामान्य मुंबईकरांसाठी मोठा दिलासा आहे. परंतु बेस्टला बस सेवा तोट्यात चालवावी लागते. बेस्ट उपक्रम हा मुंबई महानगरपालिकेचा अविभाज्य भाग आहे. मुंबईकरांना दर्जेदार परिवहन सेवा मिळत राहावी यासाठी मुंबई महानगरपालिका तसेच बेस्ट उपक्रमाचा अर्थसंकल्प एकत्र करून मांडणार.

- **मुंबईच्या रस्त्यावर बेस्टच्या छोट्या बसेस**

बदलत्या काळानुसार मुंबईच्या पश्चिम व पूर्व उपनगरांचा विकास झपाट्याने होत आहे. मुंबईतील रेल्वे स्थानकापासून दूर अंतरावर वास्तव्य करणाऱ्या जनतेसाठी छोट्या आकाराच्या बेस्ट बसेस सुरु करणार.

- **मनपा कर्मचाऱ्यांप्रमाणे बेस्ट कर्मचाऱ्यांना 'विमा कवच'**

बेस्ट उपक्रमामधील कर्मचारी अहोरात्र काम करुन मुंबईकरांना सेवा देतात. या कर्मचाऱ्यांना व कुटुंबियांसाठी 'विमा संरक्षण कवच' देऊन त्यांच्या भवितव्याची सोय करणार.

- गणवेशातील शालेय विद्यार्थ्यांना बेस्टचा प्रवास मोफत
- शिवसेनेने पाठपुरावा केलेल्या 'इलेक्ट्रिक बस'ची सेवा लवकरात लवकर प्रवाशांना उपलब्ध करून देणार.
- मुंबईकरांसाठी बस, मेट्रो व लोकल या सेवांकरिता एकच 'संयुक्त पास' ची सुविधा इतर विभागांशी पाठपुरावा करून सुरु करणार.

# सुविधा

- **गृहनिर्माण सोसायट्यांमधील जनतेलाही मुंबई महानगरपालिकेतर्फे सुविधा पुरविणार.**

मुंबई महापालिकेतर्फे झोपडपट्टीत राहणाऱ्या जनतेसाठी अनेक मुलभूत सुविधांसाठी नगरसेवक निधी वापरला जातो. गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींमध्ये राहणारी जनता देखील मतदार असून ती महापालिकेचे सर्व कर भरते. असे असतानाही नगरसेवक निधीतून तेथील जनतेला मुलभूत सुविधा दिल्या जात नाहीत. यापुढे खाजगी जागांमध्ये किंवा सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमधील जनतेलाही मुंबई महानगरपालिकेतर्फे सुविधा पुरविणार.

- **शेतकऱ्यांच्या शेतमालाची थेट विक्री करण्यासाठी जागा**

राज्यातील शेतकऱ्यांकडून येणारा भाजीपाला, फळे, कडधान्ये इत्यादी जीवनावश्यक वस्तु शेतकऱ्यांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविता याव्यात यासाठी ठिकठिकाणी विक्री केंद्रे उभारुन ग्राहकांना रास्त दरात शेतमाल पोहोचविता येईल. मुंबईकरांना ताजा भाजीपाला वाजवी किंमतीत मिळण्याबरोबरच शेतकरी-ग्राहक थेट साखळी निर्माण होईल.

- **पशु आरोग्य सेवा सुरु करणार.**

मुंबईच्या विविध भागांमध्ये प्राणीमित्र मोठ्या प्रमाणात प्राणी पाळतात. पाळीव प्राण्यांना वेळीच उपचार मिळावेत यासाठी मुंबईच्या शहर, पश्चिम तसेच पूर्व उपनगरांत पशु आरोग्य केंद्रे सुरु करणार.

# सांस्कृतिक

- ## मुंबईतील डब्बेवाल्यांसाठी 'डब्बेवाला भवन'

रेल्वेतून जिकीरीचा प्रवास करून मुंबईकर नोकरदार वर्गाला कार्यालयात वेळेवर डबे पोहचविणाऱ्या डबेवाल्यांची ओळख जगभरात 'मॅनेजमेंट गुरू' अशी झाली आहे. राज्यातील वारकऱ्यांच्या मागणीनुसार ज्याप्रमाणे मुंबईत 'वारकरी भवन' उभारण्यात आले, त्याचप्रमाणे 'डब्बेवाला भवन' उभारणार.

- ## मराठी रंगभूमीचा इतिहास सांगणारे भव्य दालन उभारणार.

महाराष्ट्राला मराठी रंगभूमीची वैभवशाली परंपरा आहे. मुंबईत सुसज्ज मराठी नाट्यगृहे आहते. मराठी रंगभूमीने अनेक दिग्गज कलाकार महाराष्ट्राला दिले आहेत, ज्यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर देश विदेशातही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. मराठी रंगभूमीचा गौरवशाली इतिहास व वाटचाल सादर करणारे भव्य दालन मुंबईत उभारणार.

# वाहतूक

- ## मुंबईतील डबेवाल्यांसाठी तसेच नागरिकांसाठी रेल्वे स्थानकाजवळ दुचाकी स्टॅन्ड

मुंबईत वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे प्रदुषणाचे प्रमाणही वाढत आहे. रेल्वे स्थानकापासून दूर राहणारी जनता खाजगी दुचाकी वाहनांचा वापर करुन रेल्वे स्थानक गाठते. परंतु रेल्वे स्थानकालगत पार्किंगची व्यवस्था नसल्याने वाहन चालकांची अडचण होते. यातून मार्ग काढण्यासाठी तसेच मुंबईतील प्रदुषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी रेल्वे स्थानकाजवळ मोटर सायकल स्टॅन्ड उभारणार.

# कर्मचारी

## विकास आरखडा प्रशिक्षण केंद्र उभारणार .

दर २० वर्षांनी राज्यातील प्रमुख शहरांसाठी विकास आराखडा तयार करण्यात येतो. या २० वर्षांमध्ये वाढत्या संख्येबरोबर जनतेला दैनंदिन भेडसावणाऱ्या समस्यांमध्येही वाढ झालेली असते. भौगोलिक रचनेनुसार जनतेच्या विविध भागांतील समस्याही वेगळ्या असतात. जनताभिमुख विकास आराखडा तयार करण्याचे ज्ञान व मार्गदर्शन देण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण देणारे 'विकास आरखडा प्रशिक्षण केंद्र' उभारणार.

## सफाई कामगार तसेच महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी 'घरकुल योजना'

आपल्या आयुष्यातील ३० ते ४० वर्षे मुंबई महानगरपालिकेची चाकरी करुनही महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना मुंबईत घर घेणे शक्य होत नाही. त्यामुळे सेवानिवृत्त झाल्यानंतर घर सोडावे लागते. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना मुंबईत हक्काचे घर घेता यावे, यासाठी मुंबई महापालिकेच्या विविध जागांवर कर्मचाऱ्यांसाठी मालकी हक्काची 'घरकुल योजना' राबविणार. तसेच वाढत्या संख्येने कर्मचारी निवासस्थाने बांधणार. तसेच सफाई कामगारांसाठी 'घरकुल योजना' राबविणार.

## महापालिका कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थांमधील इमारतींना पुनर्विकासाकरिता अधिक चटईक्षेत्र मिळावे यासाठी धोरण ठरवून राज्य सरकारकडे पाठपुरावा करून मंजूर करून घेणार.

## सफाई कामगारांच्या आरोग्यासाठी अत्याधुनिक साहित्य देणार.

मुंबईत दरदिवशी निर्माण होणारा घनकचरा उचलून तो डम्पिंग ग्राऊंडपर्यंत नेण्याचे काम मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांकडून अविरत करण्यात येते. मुंबईचे रस्ते, गटारे, नाले साफ करण्याचे कामही या कामागारांकडून प्रतिकुल परिस्थितीतही करण्यात येते. ही कामे करताना या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य अबाधित रहावे तसेच सफाईची कामे सुरक्षितपणे करण्यासाठी महापालिकेतर्फे अत्याधुनिक साहित्य देणार.

# क्रीडा

- **फुटबॉलसाठी मैदाने तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे नेमबाजीचे प्रशिक्षण केंद्र बनविणार.**

  मागील काही वर्षांमध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. नेमबाजीच्या स्पर्धेत ऑलिम्पिकमध्ये खेळाडूंनी चांगली कामगिरी केली आहे. या खेळाडूंना प्रशिक्षणासाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्यास खेळांचा विकास अधिक झपाट्याने होईल. त्यामुळे मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे नेमबाजी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा संकल्प आहे. युवकांमधील फुटबॉलचे वाढते आकर्षण लक्षात घेऊन मुंबईत विविध ठिकाणी फुटबॉल मैदाने विकसित करणार.

- **गोवंडी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल**

  विविध क्रीडा प्रकारांना अधिक चालना देण्यासाठी तसेच योग्य क्रीडा प्रशिक्षण देण्यासाठी पूर्व उपनगरांतील गोवंडी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारणार.

- **मुंबई शहरात ४ मोठे जलतरण तलाव उभारणार व महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना ते मोफत उपलब्ध करून देणार.**

# कोळीवाडे

- **गावठाण व कोळी वाड्यातील मूळ बांधकामे अधिकृत करणार.**

  मुंबईतील कोळीवाडे हे 'सीआरझेड' बधित क्षेत्रात येत असल्याने त्यांचा विकास खुंटला आहे. अशा कोळीवाड्यांच्या विकासासाठी त्यांना गावठाणाचा दर्जा देऊन त्यांची मूळ बांधकामे अधिकृत करणार.

शिवसेना

# जे बोलतो,
# ते करून दाखवतो !

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, दादर, मुंबई द्वारा प्रकाशित मुद्रक : जॅक प्रिंटर्स, मुंबई प्रती : ३०००